महावितरण

क्र.साप्रवि/रवका/सा.आ.११७/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

## सुधारपत्र क्र. ३७ दिनांक १४ / १२ / २००६

(सर्वसाधारण आदेश क्र.११७ (क) दि.३१.३.१९८६ करिता)

विषय : पुनर्रचित म.रा.वि.मंडळाच्या सर्व कंपन्यातील कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २००५ ते फेब्रुवारी २००६ पर्यंतची महागाई भत्त्याची थकबाकी देण्याबाबत.

संदर्भ : सुधारपत्र क्र.३६ दिनांक १८.२.२००६

.....

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-११०५/प्र.क्र.९/सेवा-९ दि.८.११.२००५ अन्वये शासनाच्या सर्व कर्मचा-यांना दि.१.११.२००५ पासून ४ % वाढीव दराने वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या १७ % ऐवजी २१ % या सुधारित दराने महागाई भत्ता मंजूर केला होता.

२. मात्र आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने सदर शासन निर्णयान्वये सुधारित महागाई भत्त्यातील ४ % वाढ म्हणजे ६७% ऐवजी ७१% महागाई भत्ता पुनर्रचित म.रा.वि. मंडळाच्या सर्व कंपन्यातील कर्मचा-यांना नोव्हेंबर २००५ ऐवजी मार्च २००६ पासून अनुज्ञेय करण्यात आला होता व या बाबतच्या सूचना सुधारपत्र क्र.३६ दि.१८.२.२००६ अन्वये प्रसृत करण्यात आल्या होत्या.

३. आता व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी, महानिर्मिती कंपनी, महापारेषण कंपनी व म.रा.वि.मंडळ सूत्रधारी कंपनी यांनी शासन निर्णय दि.८.११.२००५ अनुसार सदर सुधारित ७१% महागाई भत्ता, नोव्हेंबर २००५ पासून सर्व कंपन्यांच्या पात्र कर्मचा-यांना अदा करण्यास मंजुरी दिली आहे.

४. नोव्हेंबर २००५ ते फेब्रुवारी २००६ पर्यंतच्या ४ % या वाढीव दराने महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम माहे डिसेंबर २००६ च्या वेतनाबरोबर अदा करण्यात यावी.

५. महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम प्रदान करण्यासंबंधात विद्यमान तरतुदी व कार्यपध्दतीमध्ये कोणताही बदल नाही.

६. सर्व कंपन्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांनी उपरोक्त वाढीव महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम प्रदान करण्याकरिता आवश्यक असलेल्या निधीसाठी, त्यांच्या मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) यांचेकडे त्वरीत मागणी करावी.

सही/- १४.१२.०६

**( सु. य. पाटील )**
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रत प्रेषण यादीप्रमाणे :-
१) म.रा.विद्युत् वितरण कंपनी मर्या., प्रकाशगड,बांद्रा, मुंबई
२) म.रा.विद्युत् निर्मिती कंपनी मर्या., प्रकाशगड,बांद्रा, मुंबई
३) म.रा.विद्युत् पारेषण कंपनी मर्या., प्रकाशगंगा,बांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई
४) म.रा.वि.मंडळ सूत्रधारी कंपनी, हॉंगकॉंग बॅंक बिल्डींग, मुंबई

प्रत सविनय सादर :-
१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.विद्युत् वितरण कंपनी मर्या., प्रकाशगड,बांद्रा, मुंबई
२) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.विद्युत् निर्मिती कंपनी मर्या., प्रकाशगड,बांद्रा, मुंबई
३) व्यवस्थापकीय संचालक,म.रा.विद्युत् पारेषण कंपनी मर्या., प्रकाशगंगा,बांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई
४) व्यवस्थापकीय संचालक,म.रा.वि.मंडळ सूत्रधारी कंपनी, हॉंगकॉंग बॅंक बिल्डींग, मुंबई